## हृद्य सोहळा...

अनिल शिंदे



जिथे आई- बापांचा पत्ता नाही तिथे सख्खे बहीण भाऊ असण्याचा प्रश्नच नाही... ना रक्षाबंधन ना भाऊबीज... अनाथ मुलांच्या आयुष्यातील हा सल दूर करण्यासाठी ठाण्यातील कोरम मॉलने मंगळवारी १५० अनाथ मुलामुलींसाठी रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा आयोजित केला होता. यावेळी 'एहसास' या एनजीओने तयार केलेल्या राख्या बहिणींनी भावांच्या हातावर बांधल्या.